# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## इ प्रभाग कार्यालय
## कार्यपत्रिका क्रमांक - २
## सभावृत्तांत

दिनांक - ०४/०५/२०१६ वेळ दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दि.०४/०५/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. **मा.डॉ.श्रध्दा बाजीराव लांडे – सभापती**
२. मा.नितीन प्रताप निकाळजे
३. मा.सुनिता (माई) पांडूरंग गवळी
४. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
५. मा.शुभांगी संतोष लोंढे
६. मा. Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
७. मा.रसाळ विजय सुदाम - स्विकृत सदस्य
८. मा.सोमवंशी प्रकाश ब. - स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.श्री.चंद्रकांत इंदलकर- क्षेत्रीय अधिकारी, मा.श्रीनिवास दांगट- प्रशासन अधिकारी,मा.थोरात– कार्य अभियंता, (विद्युत)), मा.श्री.कोंडे के.बी. उपअभियंता, (पाणीपुरवठा), मा.अर्चना अत्तरदे – उपअभियंता, मा.काटकर पी.बी.- उपअभियंता, (पाणीपुरवठा), मा.वाघमारे एस.व्ही. उपअभियंता (स्थापत्य) मा.पांचाळ बी.के. – क.अभियंता, मा.गनबोटे ए.पी. क.अभियंता,मा.उंडे ए.पी.- क.अभियंता, मा.व्ही.एस.ताकवले- क. अभियंता मा.कातोरे पी.बी. क.अभियंता (विद्युत), मा.धडस ए.आर.- क.अभियंता, मा.श्री.खैरे जी.एन.स.उ. निरीक्षक, मा. श्री. इप्पकायल एस. एच. लेखाधिकारी, मा.पी.आर.तावरे – मुख्य आरोग्य निरीक्षक, मा.देशमाने पी.एस.- कार्यालयीन अधिक्षक, मा.बी.सी.लोंढे – मुख्यलिपिक, मा.श्री.फुगे एन.जे.- सहा.क्रिडा पर्यवेक्षक, मा.जी.एन.गोरे – अतिक्रमण निरीक्षक,

-----

**मा.सभापती-** सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

**विषय क्रमांक १.**प्रभाग समितीमध्ये प्रभाग क्र. ३५ मधील कामांना मंजूरी देणेबाबत.

मा. Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे यांचे पत्र.

**विषय क्रमांक २.** प्रभाग क्र. ३५ भोसरी येथील जुन्या भाजी मंडई मधील मच्छीमार्केट शेड व सुरक्षा रक्षक केबीन पाडणेबाबत. मा. Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे यांचे पत्र.

----

अ (दिनांक ३/२/२०१६ रोजी झालेल्या सभेचा )कार्यक्रमपत्रिका १३ ( सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक २/३/२०१६ रोजी झालेल्या सभेचा (कार्यक्रमपत्रिका १४) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

क) दिनांक ६/४/२०१६ रोजी झालेल्या सभेचा (कार्यक्रमपत्रिका ०१) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-------

ठराव क्रमांक- ३ विषय क्रमांक- १

दिनांक- ४/५/२०१६

सूचक- मा.नितीन काळजे अनुमोदक- मा.शुभांगी लोंढे

संदर्भ – मा.महेशदादा लांडगे आमदार,भोसरी विधानसभा यांचेकडील दिनांक ५/४/२०१६ चे पत्र.

देहू आळंदी रोड या रस्त्यास सस्ते पाटील मार्ग हे नामकरण होणेबाबत. पुणे नाशिक रोडलगत व हवालदार वस्ती लगतचा मार्ग या ठिकाणी उपरोक्त नावाचे नामफलक लावणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक- ४ विषय क्रमांक- १

दिनांक- - ४/५/२०१६

सूचक- मा. Adv.नितीन लांडगे अनुमोदक - मा.डॉ.श्रध्दा लांडे

संदर्भ- मा. Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे यांचे पत्र.

इ प्रभाग समितीच्या दिनांक ४/५/२०१६ चे सभेमध्ये प्रभाग क्र. ३५ (भोसरी गावठाण) खालील विषयांना मंजूरी मिळावी ही विनंती. खालील ठिकाणचे स्वच्छतागृहांचा वापर होत नसल्याने ते पाडावेत. खालील परिसरात राहणा-या नागरीकांनी स्वच्छतागृहांची स्वत: सोय केलेली असल्यामुळे सार्वजनिक स्व्च्छतागृहे निष्कासित करण्यात यावी. १) पी.सी.एम.टी.चौकातील करसंकलन इमारतीचे शेजारील ११७ सिट्सचे दुमजली स्वच्छतागृह निष्कासित करणेत यावेत व तेथे ५ सिट्सचा स्त्रियांसाठी व ५ सिट्सचा पुरुषांसाठी स्वच्छतागृह म.न.पा.खर्चाने बांधणे. व तेथे एक मुतारी बांधणे. २) संत ज्ञानेश्वर भाजी मंडई जवळील ६० सिट्सचे स्वच्छतागृह (दुमजली) वडकेवाडा जवळील निष्कासित करणे. ३) लांडगे लिंबाची तालीम येथील ५ ब्लॉक ३२ सिट्सचे स्व्च्छतागृह निष्कासित करणेत यावेत. ४) बापुजी बुवा चौक येथील १ ब्लॉक ३९ सिट्सचे स्वच्छतागृह निष्कासित करणेत यावेत ५) संत ज्ञानेश्वर भाजी मंडई भोसरी येथील मंडईच्या आतील सुलभ शौचालय १ ब्लॉक २२ सिट्सचे स्वच्छतागृह निष्कासित करणेत यावेत. ६) डोळस वस्ती येथील १ ब्लॉक २० सिट्सचे स्वच्छतागृह निष्कासित करणेत यावेत. ७) सयाजी ठाकुर मार्ग येथील १ ब्लॉक ५ सिट्सचे स्वच्छतागृह

निष्कासित करणेत यावेत ८) पी.सी.एम.सी चौक व नाशिक रोड शिवाजी शाळेजवळील मुतारी निष्कासित करणेत यावेत. तरी वरील स्व्च्छतागृहे निष्कासित करणेस मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक- ५ विषय क्रमांक- २

दिनांक- - ४/५/२०१६

सूचक- मा. Adv.नितीन लांडगे अनुमोदक - मा.डॉ.श्रध्दा लांडे

संदर्भ- मा. Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे यांचे पत्र.

प्रभाग क्र. ३५ भोसरी (भोसरी गावठाण) येथील सध्याची जुनी भाजी मंडई पाडून नवीन भाजी मंडई बांधणेत येणार आहे. सदरचे बांधकामामुळे मंडईचे आवारात असलेने मच्छीमार्केट शेड व सुरक्षा रक्षक केबीन निष्कासित करावे लागणार आहे. तरी वरील मच्छीमार्केट शेड व सुरक्षा रक्षक केबीन निष्कासित करणेस मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

जागतिक बँकेच्या सहाय्याने पिंपरी चिंचवड महानगरपालिका SUTP अंतर्गत शहरात बीआरटीएस कॉरीडॉर विकसीत करीत आहेत्या अंतर्गत . विविध Technical assistance studies साठी जागतिक बँकेकडून GEF Grand मधून सल्लागार नेमण्यात आले आहेतत्यापैकी . Parking Policy & Master Plan यासाठी UMTC New Delhi यांची सल्लागार म्हणून महानगरपालिके मार्फत नेमणूक करण्यात आली आहे सदर सल्लागारांनी .पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध भागाचे सर्वेक्षण व अभ्यास करुन पार्किंग पॉलीसीचा मसुदा तयार केला आहे सदर .पार्किंग पॉलिसीच्या मसुदयाचे सादरीकरण करणेत आले.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(मा.डॉ.श्रध्दा बाजीराव लांडे)
सभापती
इ प्रभाग समिती
भोसरी – ३९.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - ३९
क्र-इक्षेका/कावि/४/२७७/२०१६
दिनांक- २४/०५/२०१६

सही/-
प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)
इ क्षेत्रीय कार्यालय
भोसरी – ३९.

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

**दि.४/५/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता इ प्रभाग कार्यालयाचे मासिक सभेत खालीलप्रमाणे मा.नगरसदस्यांनी चर्चा केली.**

**मा.डॉ.श्रध्दा बाजीराव लांडे (सभापती) –** आरोग्य विभागाकडून शौचालय पाडून निष्कासीत करण्यात यावे.

**मा.प्रभाकर तावरे – (मुख्य आरोग्य निरीक्षक)** - तीस वर्षापुर्वीचे जुने बांधकाम आहे. पाण्याच्या टाक्या नादुरुस्त असल्यामुळे पाणी येत नाही. त्या टाक्या दुरुस्त केल्या होत्या. आता परत कराव्या लागतील.

**मा.डॉ.श्रध्दा बाजीराव लांडे (सभापती) -** बापुजी बुवा चौकात लोकसंख्या खूप आहे. जुने शौचालय पाडून नवीन शौचालय करण्यात यावे.

**मा.नितीन काळजे** – माझ्या वॉर्डमधील शौचालयाचे काम थांबले आहे. माझे वॉर्डमधील बरेचसे फॉर्म दिले आहे. सर्वात जास्त फॉर्म माझे वॉर्डमधील आहे. ८ हजार रुपये जमा होऊन आता त्यांना चार महिने झाले आहे. त्यांचे काम कोण पाहात आहे?

**मा.क्षेत्रीय अधिकारी** – स्वच्छ भारत अभियान अंतर्गत शौचालयाचे कामाचे मोठया प्रमाणात टार्गेट दिले आहे. पहिला हप्ता दिला आहे. दोन दिवसात आम्ही सर्व यंत्रणा घेऊन येतो.

**मा.नितीन काळजे –** पाण्याची वेळ कशी राहणार आहे. एक दिवसा आड सुध्दा पाणी व्यवस्थित येत नाही.

**मा.अंकुश कोंडे – (उपअभियंता पाणीपुरवठा) –** काल परवापासूनच पाणी एक दिवसाआड केले आहे. नंतर पाणी सुरळीत करण्यात येईल.

**मा.नितीन काळजे –** पाणीपुरवठा विभागाने कुठेकुठे कामे केली आहे? बाकीची कामे का करीत नाही? काम करण्यास काय अडचण आहे? तुम्ही काम करण्याचे का टाळता? पाणी पुरवठा व्यवस्थीत देत नाही. परंतू टेंडर तर पुर्ण करु शकतो. टेंडर का ठेवले आहे?

**मा.बगली – (क.अभियंता पाणीपुरवठा)** – जी कामे करणे शक्य होती ती कामे पुर्ण आहेत. व काही कामे चालू आहेत. डी.पी.रस्त्याच्या कडेने जागा उपलब्ध होत नसल्याने मोठी कामे पुर्ण झालेली नाही व त्या कामाची ठराविक (१वर्ष) मुदत आहे. लोकवस्ती कमी असल्यामुळे व पाईपलाईन जास्त लांबीचे टाकावे लागणार असल्याने पाणी पुरवठा होण्याची शक्यता नाही.

**मा.नितीन काळजे –** माझे वॉर्डात खोदून ठेवलेले आहे. आमच्या प्रभागाची तरतूद लेस झाली आहे. आम्हाला काहीच करता येत नाही. आमची कामे होत नाही. टेंडर आहे, एजन्सी आहे तरी पण कामे होत नाही. काय अडचण आहे, काम करणार आहे का नाही.

**मा.अंकुश कोंडे – (उपअभियंता पाणीपुरवठा) -** पावसाळयाच्या आत कामे करुन देतो.

**मा.नितीन काळजे –** माझे वॉर्डमधील काम कधी चालू होईल ते सांगा.

**मा.डॉ.श्रध्दा बाजीराव लांडे (सभापती) -** नितीन काळजे यांचे वॉर्डमधील काम त्वरीत करुन दया.

**मा.शुभांगी लोंढे** – सुलभ शौचालयाचे कामाचे कॉन्ट्रॅक्ट कोणाकडे आहे?

**मा.प्रभाकर तावरे (मुख्य आरोग्य निरीक्षक) -** झा कॉन्ट्रॅक्टर यांचेकडे कॉन्ट्रॅक्ट आहे.

**मा.शुभांगी लोंढे** – झा कडे कॉन्ट्रॅक्ट आहे परंतू ते काहीच काम करीत नाही. त्यांना लगेच माझेकडे पाठवा.

**मा.क्षेत्रीय अधिकारी** – इ प्रभागाच्या सर्व अधिका-यांची माहिती दयायची आहे. ती सर्वांनी उपलब्ध करुन दयावी.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.